रयत शिक्षण संस्थेचे,

# सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

(स्वायत्त महाविद्यालय)

## शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग

## आयोजित

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय खो-खो महिला स्पर्धा २०२२-२३

## अहवाल

महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्यावातीने दिनांक २०व २१ ऑक्टोबर २०२२ रोजी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय खो-खो महिला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेकरिता प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .मोहन राजमाने हे उपस्थित होते.अध्यक्ष उपप्राचार्य प्रा.नेताजी सूर्यवंशी हे उपस्थित होते. या स्पर्धेकरिता सांगली,सातारा,कोल्हापूर या तीनही जिल्ह्यातील एकूण १२ संघ उपस्थित होते.तसेच निवड चाचणी करिता विविध महाविद्यालयातील एकूण ४५ खेळाडू उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन राजमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून क्रीडांगणाचे श्रीफळ वाढवून उद्घाटन केले.या कार्यक्रमाकरिता विविध महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक, प्रशिक्षक व पंच उपस्थित होते.

**या स्पर्धेतील विजयी संघ पुढीलप्रमाणे -**

**प्रथम क्रमांक -** स्वामी विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर

**द्वितीय क्रमांक –** सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज,कराड

**तृतीय क्रमांक –** मथुबाई गरवारे कॉलेज,सांगली

या विजयी संघाना महाविद्यालयाचे रजिस्ट्रार श्री.राजू गायकवाड यांच्या शुभ हस्ते पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिमखाना विभाग प्रमुख प्रा.विद्या पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.सचिन चव्हाण यानी केले.आभार प्रा. ज्ञानेश्वर टेकाळे यांनी मानले.

**प्रमुख**

**शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग**